MHAU050000072026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४/२०२६.**

**बाजीराव गोपीनाथ शेळके व इतर**

**वि.**

**निरंक.**

## निशाणी क्रमांक १ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील व अर्जदार क्र. ४ यांचे पती नामे गोपीनाथ बाळा शेळके हे दिनांक १९.०८.२०२३ रोजी मौजे लाख खंडाळा, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद येथे मयत झाले आहे. मयत गोपीनाथ बाळा शेळके यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना सरकारी कामाकरीता, शासकीय कामाकरीता व इतर वैयक्तीक कारणास्तव वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक व गरजेचे झालेले आहे; म्हणून सदरचा अर्ज अर्जदार यांनी मयत गोपीनाथ बाळा शेळके यांचे कायदेशीर वारस असल्याचे ठरवून मिळण्याकरीता दाखल केला आहे.

३. अर्जदारांनी अर्ज दाखल केल्यानंतर अर्जाची जाहीर सुचना व जाहीर

प्रकटन दिल्याप्रमाणे दैनिक ''महाभूमि'' या वृत्तपत्रात दि. २९.०१.२०२६ रोजी प्रकाशित करण्यात आले व अर्जाबद्दल काही आक्षेप असल्यास न्यायालयास कळविण्यास सांगितले, परंतू अद्याप न्यायालयास कोणताही आक्षेप प्राप्त झाला नाही.

४. अर्जदारांतर्फे विधिज्ञ एम. के. जाधव यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. प्रस्तुत अर्जाचे निर्णयाकामी खालील मुद्दे अर्जाच्या निकाल निश्चिती करीता उपस्थित झाले. त्यांचेवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत गोपीनाथ बाळा शेळके यांचे कायदेशीर वारस असून वारसाचा दाखला मिळण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीताः–**

६. अर्जदारांतर्फे अर्जदार क्र.१. बाजीराव गोपीनाथ शेळके यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन कथन केले की, अर्जदार हे मयत गोपीनाथ बाळा शेळके यांचे कायदेशीर वारस आहेत. सदर अर्जासोबत दस्तऐवज यादी सोबत अर्जदारांनी मयत गोपीनाथ बाळा शेळके यांचे मुळ मृत्यु प्रमाणपत्राची स्कॅन प्रत, अर्जदार

यांचे आधार ओळखपत्रांच्या स्कॅन प्रती व गट क्र. ३२ मौजे लाख खंडाळा च्या ७/१२ उता–याची ऑनलाईन प्रत दाखल केलेली आहे. तद्नंतर अर्जदारांनी पुरसीस दाखल करून त्यांचा पुरावा बंद केला आहे.

७. अर्जदारांनी दाखल केलेल्या प्रस्तुतच्या अर्जास कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदारातर्फे दाखल करण्यात आलेला लेखी पुरावा हा तोंडी पुराव्यास पुरक असून अबाधित आहे. अर्जदारांनी दाखल केलेला अर्ज व जाहीर प्रकटन दाखल केल्यानंतर कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदारांतर्फे अर्जदार क्र.१ यांनी दाखल केलेल्या पुराव्याचे शपथपत्रामध्ये अर्जदार हे मयत गोपीनाथ बाळा शेळके यांचे वारस असून त्यांना इतर कोणीही वारस नसल्याचे कथन केले आहे. वरील कथने विचारात घेता मयत गोपीनाथ बाळा शेळके यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे स्पष्ट होते.

८. अर्जदारानी अभिलेखावरती दाखल केलेल्या उपरोक्त पुराव्याबाबत शंका घेण्याची परिस्थिती दिसून येत नाही. तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता मयत गोपीनाथ बाळा शेळके यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याचा निष्कर्ष काढण्यास कोणतीही हरकत नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीताः</u>–**

९. मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदविल्याने अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत गोपीनाथ बाळा शेळके यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र ठरलेले आहे. परिणामतः अर्जदारांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता मुद्दा क्र.२ चे उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१. बाजीराव गोपीनाथ शेळके, अर्जदार क्र.२. वसंत गोपीनाथ शेळके, अर्जदार क्र.३. मनिषा गोकुळ वैद्य व अर्जदार क्र. ४. वच्छलाबाई गोपीनाथ शेळके हेच मयत गोपीनाथ बाळा शेळके यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

३. वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरीता अर्जदार यांनी नियमाप्रमाणे योग्य ते न्यायालयीन शुल्क न्यायालयात जमा करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHAZIYA KHAN
Date: 2026.03.12 17:19:22 +0530

दिनांकः १२.०३.२०२६ (**श्रीमती एस. के. खान**)
वैजापूर. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वैजापूर.